2021 - 22

आदिवासी साहित्य, संस्कृती आणि अस्मितेचे प्रतीक

ISSN 2319-6033


१५ सप्टेंबर २०२१
वर्ष-१४ वे, अंक १० वा.
किंमत रू. २५/-
पृष्ठे - २८

पृ. 3


पाऊलवाट


(मासिक)

शोधनिबंध









संपादक :- डॉ. मारुती आढळ । देवराम आढळ

मुख्य संपादक
डॉ. संजय लोहकरे

सहसंपादक
प्रा.डॉ.तुकाराम रोंगटे डॉ. मारूती आढळ

उप संपादक
डॉ. सोनू लांडे, डॉ. मधुचंद्र भुसारे

कार्यकारी संपादक
मा. संजय इदे डॉ. सुनील घनकुटे

प्रसिद्धी
देवराम आढळ सुनील फलके
पंकज इरनक प्रा. रामदास गिळंदे

संपादक मंडळ
तुकाराम धांडे कृष्णा साबळे
कैलास धिंदळे देवदत्त चौधरी
राहूल शेंगाळ अभिजित करवंदे
सीता भोजने डॉ. कुंडलिक पारधी
मेजर विठ्ठल बांगर रोहिदास डगळे
रोशन जांबू

अक्षरजुळवणी:
सरिता ग्राफिक्स अॅण्ड प्रिंटर्स,
अमरावती

प्रकाशन स्थळ / पत्र व्यवहार
संपादक - डॉ. संजय यशवंत लोहकरे
निरगुडेवाडी (विठे) ४२२ ६०४
ता. अकोले, जि.अहमदनगर
संपर्क: ९६५७५४९०७६, ९४०४९७९६८३
ई-मेल : phadki@rediffmail.com

(मासिकातील लेखांशी संपादक सहमत असेलच असे नाही)

अनुक्रमणिका

- **आदिवासी आत्मकथनांची वाटचाल**
  डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर ०३
- **निधर्मी मसनवटा**
  संजय लोहकरे १०
- **कोंबडीच्या अंड्याएवढा धान्याचा दाना**
  लिओ टॉलस्टॉय (मराठी अनुवाद : संजय लोहकरे, दुर्गेश बोरसे) १४
- **वळवाचा पाणी**
  मारुती आढळ १७

वर्गणीचे दर
वार्षिक:- ३०० रू., दशवार्षिक:- २५०० रू.,
आजिव :- ५००० रू.
संपादकीय पत्त्यावर मनी ऑर्डर, चेक
किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी.
'फडकी' (Fadaki) या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.
बँक ट्रान्स्फरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा, अकोले, जि. अहमदनगर
बचत खात्याचे नाव :- फडकी (Fadaki)
बचत खाते क्र. :- ६०३०७९६६८५४
IFSC Code :- MAHB०००१६४१
MICR No. :- ४२२०१४५०२

आदिवासी आत्मकथनांची वाटचाल

डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, घोडेगाव

प्रास्ताविक:—

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दिनांक १० व ११ नोव्हेंबर १९७९ रोजी भद्रावती, जिल्हा चंद्रपूर येथे संपन्न झालेल्या 'पहिल्या आदिवासी साहित्य संमेलना'पासून ते आजतागायत आदिवासी साहित्याची चळवळ आणि आदिवासींचा अस्मिता जागर प्रभावशाली बनत आहे. कविता, कथा, कादंबरी, स्वकथने, चरित्रलेखन, नाटक, ललितगद्य, लेखसंग्रह, वैचारिक, लोकसाहित्य, समीक्षा व प्रबंधलेखन इ. विविध प्रकारांत आदिवासींचे वर्तमानकालीन व समकालीन वास्तव अधोरेखित होत आहे. आदिवासी साहित्याबद्दल या साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, "आदिवासी साहित्य हे कोणत्याही इतर साहित्याची प्रतिकृती नाही. ते स्वतंत्र, स्वयंभू व स्वयंसिद्ध आहे. त्यांच्या प्रेरणा त्यांच्या अस्तित्वाइतक्याच प्राचीन व पृथक आहेत. आदिवासी साहित्य हे या देशातील नव्हे तर अखिल विश्वातील मूळ मानव समूहांचे व टोळ्यांचे सांस्कृतिक मूल्यांनी मटलेले नवे—जुने व्यापक साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे केवळ मराठी साहित्याचेच नव्हे, तर विश्व साहित्याचे वैभव लेणे आहे."[१] या वैभव लेण्यात भर घालणारी आदिवासींच्या स्वकथनांची निर्मिती अभिमानास्पद बाब आहे. या लेखात आदिवासी साहित्यिकांनी लिहिलेल्या स्वकथनाचेच विवेचन करणार आहे. नजुबाई गावित यांचे 'आदोर' (१९९५), बाबाराव मडावी यांचे 'आकांत' (१९९८), किसन डगळे यांचे 'ठिगळ' (२००८), रामराजे अत्राम यांचे 'उघडा दरवाजा' (२००९), सीताराम जोशी यांचे 'अधिकारी माणूस' (२०१५), डॉ. राजेंद्र धनकर यांचे 'आधाचं कारटं' (२०१८), सुनील गायकवाड यांचे 'बाडगीनी धार' (२०१९), प्रा. माधव सरकुंडे यांचे 'भुमकाल' (आगामी प्रकाशन) इ. स्वकथनांची चर्चा करणार आहे.

गेल्या चार दशकात आदिवासी स्वकथनांची संख्या फक्त सात इतकी आहे. या उलट दलित साहित्यात दलित स्वकथनांची विपुल निर्मिती झालेली आहे. कारण दलित समाजात शिक्षण सर्वदूर पोहोचल्याचा हा विधायक सांस्कृतिक ठेवा असावा. दलित साहित्य आणि विद्रोही लेखकांचा आदर्श नजरेसमोर ठेवून अल्प प्रमाणात आदिवासी लेखकांनी स्वकथनांची निर्मिती केलेली आहे. दलित स्वकथने ही दलित लेखकांच्या जीवनाचा इतिहास असली, तरी दलित जीवनाचा सामाजिक दस्तऐवज म्हणूनही दलित स्वकथनांकडे बघितले जाते. याप्रमाणेच आदिवासींच्या अस्तित्व, अस्मिता आणि संघर्षाचा सामाजिक दस्तऐवज म्हणूनही आदिवासी स्वकथनांकडे बघावे लागेल. आदिवासी साहित्यातील १९८० नंतरच्या बंडखोर लेखिका नजुबाई गावित होय. त्यांनी लिहिलेले 'आदोर' हे स्वकथन होय. "देशातील आदिवासी महिलेचं पहिलं

आत्मकथन आहे.''[२] असे दलित साहित्याचे समीक्षक प्रा. डॉ. मनोहर जाधव म्हणतात, या आत्मकथन / स्वकथनाबद्दल डॉ. मनोहर जाधव म्हणतात की, ''धुळे जिल्ह्यातील नवापूर आणि साक्री तालुक्यातील आदिवासी जीवन 'आदोर'मध्ये अधोरेखित झाले आहे. नजूबाई गावितांचे कार्यक्षेत्र देखील धुळे जिल्ह्यातील आदिवासी पट्ट्यात आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जीवनानुभूती आणि कार्यकर्तीची दृष्टी या रसायनातून हा आविष्कार प्रकट होतो. लेखकाजवळ निश्चित जीवनदृष्टी आणि व्यापक डोळसभान असेल आणि त्यातल्या त्यात प्रत्यक्ष समूहपातळीवर मूल्यात्मक संघर्ष करणारा कार्यकर्ता असेल, तर त्याच्या लेखनाला आपोआप एक खोली प्राप्त होते, याचे प्रत्यंतर 'आदोर' वाचताना येते.''[३]

वरील मताचे प्रत्यंतर या आत्म–कथनातून प्रकट होते. लेखिकेने खास आदिवासी जाणीव–नेणीवेतून धुळे जिल्ह्यातील मावची–भिल्ल या आदिवासी जमातीचे वास्तववादी व प्रातिनिधिक जीवनचित्रण घडविले आहे. या आत्मकथनात लेखिकेने तीन पिढ्यांचा विस्तीर्ण पट रेखाटला आहे. आदिवासी स्त्रियांच्या व्यथा, वेदना, शोषण, प्रथा, परंपरा या सर्वांचा तपशील यात आहे. आदिवासी जाणीव–नेणीवेतून नजुबाईंनी जे अनुभवले, भोगले त्याचे वस्तुनिष्ठ दर्शन त्यांनी घडविले आहे. आदिवासी स्त्रीची दमन, शोषण, छळ व पिळवणूकीची अवस्था प्रकट करणारे हे आत्मकथन आहे. समूह जाणिवेने वसाहतवादी काळात जीवन जगणाऱ्या तीन पिढीचे दु:ख यातून प्रकट होते. ''या आत्मकथनाच्या लेखनाला कल्पनेची जोड नाही, कलावादाची साथ नाही सौंदर्यवादी कल्पकता नाही. सत्याचा आभास नाही. अशा समाजसन्मुख भूमिकेतून लेखन केले आहे''[४]

या आत्मथनात पहिल्या पिढीचे नेतृत्व करणारा जंगल बिगारी कामगार पांड्या देसाई व त्याची पत्नी बीजू आहेत. प्रथम महायुद्धोत्तर फ्लूची साथ (मानमोडी) आल्यावर पांड्या व बीजू या साथीत बळी पडतात. नंतर त्यांचा मुलगा आट्या पांड्या देसाई व त्याची पत्नी इसरी होय. हे ही जंगल बिगारी कामगार आहेत. साक्री तालुक्यातील (जि. धुळे) बोडरी पाड्यात राहणाऱ्या जंगल बिगारी कामगारांची ही कुटुंब कहाणी आहे. पूर्वजांचा खांब बसविणे, आगारी करणे, अन्यथा पूर्वजांच्या कृपा–शीर्वादाअभावी हलाखीला सामोरे जावे लागते. कौटुंबिक जीवन संघर्ष, नवऱ्याचा व्यभिचार, दहा मुलांचे संगोपन हे सर्व सहन करणारी इसरी बाणेदार, स्वाभिमानीपणाचे प्रतीक आहे. 'आदोर'बद्दल डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''आत्मगौरवाच्या दूर असलेले हे स्वकथन म्हणजे नजूबाईंच्या रखरखत्या जीवनानुभवांचा एक प्रेरक ठेवा आहे. डोंगरी मातीने–चिखलाने कुरतडलेल्या आणि काट्यागोट्यांची बोचत राहिलेल्या अनवाणी पायांची वणवण बोलती करणारे हे स्वकथन एक सर्वांगसुंदर निर्मिती आहे. दृष्ट लागावी असाच हा आदिवासी स्वकथनांचा प्रारंभ आहे.''[५]

बाबाराव मडावी यांचे स्वकथन म्हणजे 'आकांत' १९९८ साली प्रकाशित झाले.

आदिवासी चळवळीतील बाबाराव मडावी हे कार्यकर्ता, लेखक आहेत. सोडून गेलेल्या आई–वडिलांची आठवण, बहीण, मामा, नातेवाईक, मोहल्यातील जीव टाकणारी माणसे या साऱ्यांच्या नि:स्वार्थ प्रेमाचा आठव म्हणजे 'आकांत' होय. या स्वकथनाबद्दल डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''आकांत ही भाकरीच्या लढ्यासाठी आणि वंचितांसाठी माणुसकीचा हक्क मागणारी यातनांची कैफियत आहे.''[६] या स्वकथनातून आपले आई–बाप, पत्नी, इतर मित्रमंडळीच्या व्यथा, वेदना लेखकाला अस्वस्थ करतात. संपूर्ण देशभर भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव अतिशय उत्साहाने साजरा होत असताना आदिवासी समाजाच्या दु:ख, वेदनेची जाणीव सरकार व समाजाला नाही, याची खंत लेखक व्यक्त करतात. आदिवासी समाजातील दारिद्र्य, उपासमार, भूक, शिक्षण, आरोग्य, कुपोषण, अन्याय, छळ, अत्याचार इ. समस्या भीषण आहेत. या समस्येत भारतीय स्वातंत्र्यानंतरही फारसा फरक पडलेला नाही. १९९० नंतरच्या जागतिकीकरणाने प्राथमिक गरजांची विवंचना संपलेली नाही. आदिवासींच्या अस्तित्वाचा प्रश्न लेखक या आत्मकथनात उपस्थित करतात. या लेखनात लेखकाची आंबेडकरी जाणीव प्रबळ आहे. आंबेडकरी विचाराच आदिवासी समाजाला तारक ठरतील असा आशावाद या लेखनातून लेखकाने प्रकट केला आहे. परधानी बोली भाषा हे या आत्मकथनाचे वैशिष्ट्य आहे.

किसन डगळे यांचे 'ठिगळ' हे स्वकथन २००८ साली प्रसिद्ध झाले. किसन डगळे यांनी या आत्मकथनाच्या रचनेत 'माझे बालपण', 'प्राथमिक, माध्यमिक, महा–विद्यालयीन शिक्षण', 'मुंबईतील नोकरीपर्व', 'विवाहबंधन', 'विक्रीकर अधिकारी' इ. पंधरा भागात विभागणी केलेली आहे. प्राथमिक शिक्षण घेताना कपड्याला 'ठिगळ' लावलेला मुलगा बक्षीस स्वीकारतो, हे लेखक मनाला बोचणारे शल्य आहे. यातून लेखकाने जिद्दीने शिक्षण पूर्ण करून विक्रीकर विभागात उपायुक्त पदापर्यंत मजल मारली. जगण्यासाठी, अस्तित्वासाठी संघर्ष अटळ आहे, याची जाणीव होऊन आपल्या समाजासाठी काहीतरी करावे ही लेखकाची इच्छा प्रबळ आहे. हा संदेश या आत्मकथनातून आजच्या सुशिक्षित आदिवासी तरुणांना मिळतो, हेच या आत्मकथनाचे यश आहे असे वाटते. जागतिकीकरणाने आदिवासींचे जगणे हतबल करून टाकले आहे. परिणामी व्यक्तिवाद, स्वार्थनिष्ठा अधिक प्रबळ झालेली आहे.

आदिवासी साहित्य विश्वात रामराजे अत्राम यांच्या 'उघडा दरवाजा' (२००९) च्या आत्मकथनाने वेगळेपण प्राप्त केले आहे. या आत्मकथनातून लेखकाने आपला जीवनपट वाचकांसमोर ठेवला आहे. हे आत्मकथन एका आदिवासी व्यक्तीच्या जीवनासंदर्भातील कथा असली तरी या देशातील आदिवासी समाजाची ती प्रातिनिधिक जीवनकथाच आहे. लेखकाने प्रथमत: व कुटुंबीयांनी जगण्यासाठी, शिक्षणासाठी म्हणून जो संघर्ष केला आहे, तो वाचकांना अस्वस्थ करणारा आहे. जिल्हा

परिषदेत कारकून म्हणून नोकरी लागेपर्यंतचा भाग हा आत्मकथेचा पूर्वार्ध आहे. या भागात आई–वडिलांच्या श्रमाचे चित्रण मन हेलावून टाकणारे आहे. आदिवासी निसर्गाशी कसा एकरूप होतो, पशुपक्ष्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते याचे अप्रतिम चित्रण येथे आहे. आदिवासींची सौंदर्यदृष्टी, त्यांची विनोदमयता, कठोर परिश्रम करण्याची वृत्ती याचा परिचय होतो. याशिवाय सतत दारूच्या आहारी जाण्याची पुरूषांची वृत्ती, अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणाऱ्या स्त्रिया, कर्मकांड, त्यासाठी घ्यावे लागणारे कर्ज, त्यातून होणारे शोषण या सर्व कारणांमुळे आर्थिकदृष्ट्या आदिवासी मागे आहेत. या आत्मकथेचा नायक समाजाभिमुख आहे. जातिकीकरणाने शिक्षण कसे महागडे केले, याचे प्रत्यंतर यात घडते. एक आदिवासी मुलगा अत्यंत प्रतिकूल अशा परिस्थितीतून बारावीची परीक्षा उत्तीर्ण होतो. शासकीय सेवेत येतो ही त्या समाजासाठी देखील क्रांतिकारी बाब असते. येथून पुढे या आदिवासी तरुणाचा प्रवास मध्यमवर्गाच्या जीवनशैलीप्रमाणे पुढे सरकतो. परंतु हा तरुण समाजापासून दूर होऊन आत्मकेंद्रित जीवन न जगता या समाजाच्या भल्यासाठी प्रयत्न करू लागतो. मध्यमवर्गीय आत्मकेंद्रित वृत्तीला या आत्मकथनात फाटा मिळाला आहे.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासनाकडून ज्या विविध योजना राबविल्या जातात, त्यात विविध अडचणींना तोंड द्यावे लागते. या अडचणी सोडविण्याचे काम लेखक स्वत: करतात. समाजाच्या विकासासाठी सतत कार्यशील असे लेखकाचे मन यात दिसते. आधुनिक काळात शिक्षण घेणाऱ्या आदिवासी तरुणांना प्रेरणा देण्यासाठी 'उघडा दरवाजा' हे उत्कृष्ट आत्मकथन आहे. असे मला वाटते. या लेखनात मूल्यभ्रष्टता नाही. विशेषत: कार्यकर्ता लेखकाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा एक माध्यम म्हणून साहित्याकडे आत्मकथेचा नायक पाहतो आहे.

सीताराम रखमा जोशी हे नाव तसे आदिवासी साहित्याला नवे होते. त्यांच्या 'अधिकारी माणूस' (२०१५) या आत्मचरित्र लेखनाने त्यांचे नाव मराठी वाचकांना आता सुपरिचित झाले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपकुलसचिव या पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर आपल्या मायभूमीत ते स्थिरावले अन् आत्मचरित्र लेखनास प्रवृत्त झाले. आपल्या या लेखनाबद्दल ते म्हणतात की, 'एका निवांतक्षणी मागे वळून पाहताना जीवनात आलेल्या अनेक संघर्षमय, शैक्षणिक, प्रशासन, सुखद, दु:खद घटनांचा यांचा आलेख डोळ्यासमोर आला आणि त्यातूनच या आत्मचरित्राची निर्मिती झाली आहे.' या आत्मचरित्र लेखनात आठ भाग आहेत. या आत्मचरित्र लेखनात पणजोबा, आजोबा, वडील, स्वत: लेखक अशा चार पिढ्यांचे चित्रण शब्दबद्ध केलेले आहे. विशेषत: लेखकाचे बालपण, शिक्षण, कौटुंबिक जीवन, विद्यापीठाचे प्रशासन व शैक्षणिक कामकाज आणि यातील ताणतणाव आहे. याशिवाय आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र राज्य या संस्थेची स्थापना व शैक्षणिक, सामाजिक कृतिशीलता हे या लेखनातील नायकाचे वेगळेपण आहे. या आत्मचरित्र

लेखनात आदिवासी कुटुंबव्यवस्था, कृषि प्रधान संस्कृती, आदिवासी सण, उत्सव, उत्तर पुणे जिल्ह्यातील निसर्ग साधनसामग्री या नैसर्गिक साधन संपत्तीचा सदूपयोग आदिवासींच्या उद्धारासाठीच करण्याची लेखकाची धडपड या लेखनात आहे.

''तू कह्याला आधी ना मंदी आलाय? कोंबड्या खुडूक झाल्यात!'' अशा मावळी भाषेतील वाक्यातून आदिवासी मुलांचे शिक्षण, आर्थिक विपन्नावस्था लक्षात येते. या आत्मचरित्राच्या भाषेबद्दल डॉ. मुक्ता आंभेरे म्हणतात की, ''आत्मचरित्राची भाषा साधीसरळ आहे. कोठेही सांकेतिक भाषा वापरली नाही किंवा अनावश्यक तत्वज्ञान लेखकाने घुसडले नाही. त्यामुळे हे आत्मचरित्र सर्वसामान्य माणसांचे प्रतिनिधित्व करते.''[७] आज शालेय, महाविद्यालयीन, विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना हे आत्मचरित्र जगण्याची, शिकण्याची नवी उर्मी मिळेल यात शंका नाही.

डॉ. राजेंद्र धनजकर यांचे 'आंधाचं कारटं' (२०१८) हे आत्मकथन प्रसिद्ध झाले आहे. महाराष्ट्रातील प्रमुख जमातीतील एक आदिवासी जमात म्हणजे आंध जमात होय. या जमातीत जन्म घेतलेल्या राजेंद्र या ध्येयवेड्या आदिम तरुणाची आणि पर्यायाने मराठवाड्यातील आंध जमातीची कहाणी या आत्मकथनात आहे. फुले आंबेडकरी प्रेरणा हा या आत्मकथनाचा स्थायीभाव आहे. ''शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा'' हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार या आत्मकथनात पानापानावर दिसतो आहे. ''तुम्ही तरी शिका रे पोरेहो'' हा लेखकाच्या अशिक्षित आईचा विचार या आत्मकथनाच्या केंद्रस्थानी आहे. लेखकाच्या वैयक्तिक जीवनातील शिक्षणाचा खडतर प्रवास वाचकांचे लक्ष वेधून घेतो. याशिवाय लेखकाच्या कौटुंबिक जीवनाबरोबरच आंध या आदिवासी जमातीचा जीवनालेख या आत्मकथनात आहे. वैयक्तिक जीवनाबरोबरच आंध जमातीच्या दु:खी कहाण्या लेखकाने शब्दबद्ध केलेल्या आहेत. या लेखनात लेखकाचे जीवनचरित्र, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च शिक्षण, संशोधन विषयक कार्य, प्राध्यापक, सामाजिक कार्य इ. विविध पातळीवरील घडामोडींचा आलेख रेखाटला आहे. शिक्षण घेत असताना झालेली परवड, प्रसंगी माणुसकीचे दर्शन घडविणारे श्री. ना. मा. कदम आणि प्राचार्य डॉ. रा. गो. चौरे सारखे शिक्षक व प्राध्यापक लाभले. या आत्मकथनाच्या प्रस्तावनेत 'आकांत'कार बाबाराव मडावी म्हणतात की, ''राजेशनं शिक्षणाचा चढता क्रम व त्यातील येणारे अनुभव वास्तवतेला धरून लिहिल्याने ते समाजव्यवस्थेच्या चिंतनाचा भाग होऊन जातो. हा भोगवटा सर्वसाधारण परिस्थितीतल्या घराघरात दिसून येतो. आदिवासींना किती संकटातून स्वत:ला घडवावं लागतं याचा दस्तऐवज यात आहे. विद्यार्थी, तरुणांना या आत्मकथनांची पाने शिक्षणाच्या सहवासात पदोपदी नेऊन सोडतात. मॅट्रिक नापास झाल्यानंतरही जिद्दीने वर्ग चढणारा राजेश बी. ए. करताना एक वेळा ए.टी.के.टी. घेऊनही जिद्दीने वर चढतच राहिला. तीन विषयात

एम.ए. करून मराठी विषयात सेट ही प्राध्यापक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाला. हा घटनाक्रम वाचकाला चिंतन करायला लावणारा आहे. शिक्षणाच्या जिद्दीने उच्च शिक्षणापर्यंत कसे पोहोचता येते हे राजेशने या आत्मकथनात मांडले आहे.''[८]

''मराठवाड्यातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास'' या विषयावर पीएच.डी.चे संशोधन करून लेखकाने आपल्या जमातीचा सखोल अभ्यास केला आहे. स्वत: लेखक आपल्या या आत्मकथनाच्या मनोगतात म्हणतात की, ''आंधाच्या काटर्यानं'' दऱ्याखोऱ्यातला आदिवासी विद्यार्थी जागा केला तरच त्या काटर्यांची किरकीर सार्थकी लागेल असंच मी म्हणेन.''[९]

'बाडगीनी धार' (२०१९) हे सुनील गायकवाड यांचे आदिवासी बोलीभाषा भिलाऊ या बोलीतील पहिलेच आत्मकथन आहे. व्यवस्थेने दरोडेखोर ठरविलेल्या दरोडेखोराच्या मुलाचे 'बाडगीनी धार' हे आत्मकथन आहे. 'बाडगीनी धार' म्हणजे मोहफुलापासून दारू तयार करणे होय. आदिवासी भिल्ल समाजातील भूक आणि गुन्हेगारीचा प्रश्न या लेखनात तीव्र स्वरूपाचा आहे. भूक आणि तृप्ती यातील विषमता मांडली आहे. या आत्मकथनाच्या पहिल्या भागात व्यवस्थेने दरोडेखोर बनवलेल्या व्यक्तिरेखा आहेत तर परिस्थितीचा प्रतिकार करणारे पोलाद नाईक, देवकी, आंबू भिल, मांगी वहिनी, वनसला, सुनंदा, परत्या बापू इ. माणसं आहेत. फुले–आंबेडकरी विचारानुसार परिवर्तनाची लढाई लढणारे स्वत: लेखक आहेत. या आत्मकथनाच्या दुसऱ्या भागात लेखकाचा बोराडी गावातील संघर्ष आहे. लेखकाची मित्रमंडळी, आदिवासी मुले, मुली, गावकरी, पाटील इत्यादींचा समावेश आहे. तिसऱ्या भागात लेखक डी.एड. प्रथमश्रेणीत उत्तीर्ण होऊन नोकरी मिळत नाही म्हणून वडिलांचा वीस वर्षे बंद पडलेला 'बाडगीनी धार'चा व्यवसाय करू लागतो. उच्चशिक्षण आणि हलक्या दर्जाचे काम असा भाव लेखकाने मनात बाळगला नाही. या आत्मकथनाचे परीक्षणकर्ते प्रा. जितेंद्र सोनवणे म्हणतात की 'बाडगीनी धार' आजच्या समाजापुढे खोल गाळात रुतलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करते''[१०]

सुनील गायकवाड प्रस्तुत आत्मकथनाच्या मनोगतात म्हणतात की, ''आम्ही काही मागत नाही, आम्ही जिंदगी मागतो''[११] माणुसकी नाकारणाऱ्या व्यवस्थेकडे लेखकाची मागणी आहे. प्रस्तुत आत्मकथनाच्या शीर्षकाविषयी डॉ. पुष्पा गावित म्हणतात की, 'बाडगीनी धार' म्हणजे आदिवासी गरीब कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी गावठी दारू (मोहांची फुले) तयार करण्यासाठी जी पारंपरिक साधने वापरून आणि मोहाच्या फुलांची वाफ करून ज्या बांबूच्या तोटीतून खाली ठेवलेल्या भांड्यात गोळा होते त्याला 'बाडगीनी धार' असे म्हणतात.''[१२] या आत्मकथनाविषयी डॉ. धनंजय भिसे म्हणतात की, ''सामाजिक जाणिवेने प्रेरित झालेल्या

सुनील गायकवाड यांनी गुन्हेगार ठरवलेल्या भिल्ल आदिवासी जमातीमधील जगण्याची क्रांतिकारी कहानी सळसळत्या शब्दरूपाने मांडून भारतीय समाजव्यवस्थेचीच जणू चिकित्सा केली आहे.''[१३]

याशिवाय गोपाळ गवारी यांची 'कोळवाडा' हे आत्मनिवेदन, लेखन संतोष पवार यांचे 'चोरटा' हे पारधी या आदिवासी जमातीचे चित्रण घडवते. प्रा. माधव सरकुंडे यांचे 'भूमकाल' हे आत्मकथन, स्वकथन आगामी काळात प्रसिद्ध होणार आहे.

वरील विवेचनाच्या आधारे खालीलप्रमाणे काही निरीक्षणे सारांश रूपाने मांडता येतील.

१) दलित साहित्यात आत्मकथनाची जशी लाट निर्माण झाली तशी आदिवासी साहित्यात निर्माण झाली नाही.

२) कार्यकर्ता, आदिवासी लेखक आपले जीवनानुभव आत्मकथनाद्वारे प्रत्ययकारीरित्या मांडू शकला आहे.

३) 'आदोर'मधून मावची जमातीची परिस्थिती, शरणता लक्षात येते.

४) दुर्बल पुरुषांपेक्षा मावची जमातीतील स्त्री बाणेदार, स्वाभिमानी आहे.

५) 'आकांत' व 'उघडा दरवाजा' तसेच 'आंधाचं कारटं' मधून फुले–आंबेडकरी विचार आणि जाणिवा व्यक्त होतात.

६) 'ठिगळ' व 'अधिकारी माणूस' मधून शिक्षण आणि अस्तित्वाचा लढा प्रखरपणे व्यक्त झालेला आहे.

७) आदिवासी आत्मकथनातील आशय आदिवासी तरुणांना प्रेरक, उद्‌बोधक, मार्गदर्शक ठरेल असा आहे.

८) जागतिकीकरणाचे परिणाम या सर्वच आत्मकथनातून जाणवतात.

संदर्भ :–

१) तुमराम, विनायक, 'मराठी वांगमयाचा इतीहास' खंड ७, भाग–१ (संपा. रा. ग. जाधव) या ग्रंथातील लेख 'आदिवासी साहित्य', म.सा.प. पुणे, प्रथमावृत्ती मे २००९, पृ. ३६१

२) जाधव, मनोहर, समीक्षा लेख दैनिक लोकमत दिनांक २८.१.१९९६

३) जाधव मनोहर, उनि

४) वाल्हेकर, ज्ञानेश्वर, आदिवासी मराठी साहित्य अभ्यास स्वरूप प्रकाशन औरंगाबाद १५ ऑगस्ट २००९ पृ. ३९

५) तुमराम, विनायक, उनि, पृ.४०६

६) मडावी, बाबाराव, आकांत' प्रिंटर्स यवतमाळ १९९८

७) आंभेरे, मुक्ता, अधिकारी माणूस (परीक्षण) आदिवासी संवाद ऑगस्ट २०१८ २८

८) मडावी, बाबाराव, आंधाचं कारटं (प्रस्तावनेतून) २०१८

९) धनजकर, राजेश, आंधाचं कारटं (मनोगतातून) २०१८

१०) सोनवणे, जितेंद्र, बाडगीनी धार' (व्हाट्सअप वरील लेख)

११) गायकवाड, सुनील, आदोर, (मनोगतातून)

१२) गावित पुष्पा, 'बाडगीनी धार' (प्रस्तावनेतून)

१३) भिसे, धनंजय 'बाडगीनी धार' वरील परीक्षण साप्ताहिक, क्रांतीसत्ता, दि. ५/११/२०२०, पृष्ठ ४.